ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**15.**

# अभंग : विकास आणि लोकप्रियता

**राहुल विनोदराव राऊत**
एम.ए.(मराठी), नेट.
महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय,
वर्धा, महाराष्ट्र.

मध्ययुगीन काळातील काव्यरचना प्रकारांनी मराठी काव्यसरितेस समृध्द केलेले आहे. महदंबेची कथाकाव्यसदृश्य धवळेरचना, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत, नाथकालीन कवी, फादर स्टिफन, मुक्तेश्वर, वामन पंडित इ. मध्ययुगीन कवींनी 'ओवी' छंदामध्ये काव्यलेखन केलेले आहे. चौपद्या, पदे, लोकगीते, स्तोत्रे, आरत्या, चित्राकृती बंधात्मक रचना, थालीपाक, स्वयंवरकाव्य, खंडकाव्य, महाकाव्य, लघुकाव्य, स्त्रीगीते, पोवाडा, लावणी इ. काव्यप्रकारांमुळे मध्ययुगीन काव्यनिर्मितीत विविधता आलेली आहे. मध्ययुगीन मराठीत काव्यप्रकारात विविधता आढळते; परंतु जनमानसापर्यंत भजन, कीर्तन, प्रवचन यांच्या माध्यमातून पोहचलेला काव्यप्रकार कोणता असेल तर तो 'अभंग' होय. ओवी हा छंद जरी मोठ्या प्रमाणावर असला तरी तो तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने येतो. अभंग हा सर्वसामान्यांसाठी संतांनी अनुभूतीचा दिलेला ठेवा आहे. संतचरित्रे, आत्मचरित्रे, अभंगरूपात प्रकट होतात. संतांनी स्फुट, तरल, भावोत्कट अनुभवांच्या अविष्कारासाठी अभंग केले. अभंगामुळे संतकाव्य परंपरा प्रवाहित झाली. आध्यात्मिक तत्त्वज्ञानाला अभंगामुळे वाट मिळाली. परिणामी समाजात चैतन्यशीलता निर्माण झाली. अभंगरचनेने महाराष्ट्र भूमी दुमदुमून गेली.

''मराठीतील अभंगवाङ्मय मध्ययुगीन उत्कट भावकाव्याचा साठा आहे. स्फुटत्त्व, उत्कटत्व, भावनुभवाची आंतरिक लय, तालबध्दता, प्रतिमांकितता, प्रतीकरूपता, तरलता, संवेदनशीलता, आविष्कारांची प्रबळता हे आधुनिक भावकवितेचे विशेष संतांच्या अभंगातून प्रकट होतात. पृथगात्म आशय व अभिव्यक्ती तसेच रचनेची विपुलता व विविधता इत्यादींमुळे मराठी अभंग प्राचीन मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा काव्यप्रकार झाला हे विशेष होय'' [१], असे डॉ.सुहासिनी इर्लेकर म्हणतात.

**'अभंग' :-**

मराठी संतकवींनी आध्यात्मिक भावना व्यक्त करण्यासाठी वापरलेला हा काव्यप्रकार आहे. सामाजिक भावनांचे चित्रण अभंगकाव्यामधून येते. अभंगाचा पैलू हा तालगेय असतो. रागदारित गातांना रचनेत अंगभूत असलेले तालाचे बंधन पाळावे लागतात. हा एक काव्यप्रकार आहे. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी अभंगाची व्याख्या केलेली आहे. ''ज्या छंदात भंग नाहीत तो अभंग. भंग म्हणजे कर्णमधुर गण अर्थात अभंग म्हणजे गणविहीनवृत्तात्मक समचरण किंवा विषमचरण छंद.''[२] असे ते म्हणतात तर 'अभिनव काव्यप्रकाश कर्ते' रा.श्री.जोग म्हणतात, ''एकच भावना असणे, एकपिंडता दिसून येणे, थोड्या अवकाशात सर्व काव्यर्थ सामावणे आणि भावनोत्कटता असणे या गोष्टी अभंगात असतात.''[३] अभंगामध्ये कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय सामावलेला असतो.

**अभंगाचे प्रकार :-**

अभंगाचे रचनाशास्त्र अभंगाच्या प्रकारानुसार आहे. अभंगाचे मुख्य दोन प्रकार आहेत. आशयानुसार अभंगाचे वर्गीकरण विविध प्रकारांमध्ये होते. प्रत्येक अभंगाची रचना स्वतंत्र व बांधेसूद असते. संपूर्णता व स्वतंत्रता हे अभंग रचनेचे वेगळेपण आहे.

**१. मोठा अभंग :-** या प्रकारच्या अभंग रचनेत प्रत्येक चरणामध्ये सहा अशी अक्षर संख्या असते. तीन चरणांमध्ये ही अक्षररचना समान असते. चौथ्या चरणात चार अक्षरे असतात. यालाच ''मोठा अभंग' म्हणतात. ज्ञानेश्वरांचे 'हरिपाठाचे अभंग' याच प्रकारात आहेत. इतर संतांनी आणि आधुनिक मराठी कवींनीही अशा प्रकारची रचना केली आहे.

उदा. '' काय वाणू आता । न पुरे ही वाणी ।।

मस्तक चरणी । ठेवीतसे ।।'' या अभंगात चरण दोन व तीन यांचे यमक साधले आहे. काही अभंगात पहिल्या तीनही चरणांचे एक यमक साधण्यात येते.

''जन हे सुखाचे । दिल्या घेतल्याचे ।

अंत हे कळीचे । नाही कोणी ।।धृ।।''

**२. लहान अभंग :-** या प्रकारात प्रत्येक चरणामध्ये आठ-आठ किंवा आठ-सहा, सहा-आठ अशा अक्षरांचे दोन समयक खंड असतात.

उदा. ''तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव ।।'' काही अभंगात चार अक्षरांचे तीन खंड व चौथा खंड तीन अक्षरी असतो.

''पुढे आता । कैसा जन्म । ऐसा श्रम । वारेसी ।।''

वरील अभंगातील चरणात दोन व तीन यांचे यमक साधलेले आहे. अभंग या शब्दाचे अर्थांतर करीत असतांना अभंग हा शब्द यादवकालीन महानुभाव गद्यग्रंथामध्ये छंद या अर्थापेक्षा वेगळ्या अर्थाने वापरला जात होता. याविषयी 'संतवाणीतील पंथराज' या ग्रंथात शं.गो.तुळपुळे 'अभंग' या शब्दाच्या उल्लेखाविषयी म्हणतात,

- ''तेयाचे पुत्र जाति पदे करीतीः ते विठो-रूक्मिणी अभंगी घालितीः'' (लीळाचरित्र, उत्तरार्ध ४११ 'विठ्ठलवीरूकथन' या लीळेतून.)
- ''यावरी राये म्हणितलेः या ग्रंथाचा अभंग मज देयावाः मी जेतुकीया वोवीया तेतुके सोनटके आणि चौथरिया आसू वोवाळणी घालीन.'' ('स्मृतिस्थळ', ११३, नरेंद्राच्या 'रूक्मिणी-स्वयंवर' काव्याच्या रचनेची आठवण.)
- ''पंडितबासी वत्साहरण केलेः तेथ अभंगी सौजन्य केसोबासाते घातलेः'' (स्मृतिस्थळ', वा.ना.देशपांडे, प्रत, अज्ञात स्मृती १६६)

वरील परिच्छेदावरून अभंग घालणे, अभंग देणे म्हणजेच ग्रंथ लिहिणाऱ्याचे नाव शेवटी देणे होय. थोडक्यात, अभंग या शब्दाला कविनामाची मुद्रिका देणे हा त्याचा अर्थ होता. अभंग म्हणजेच मुद्रिका हा अर्थ महानुभावांच्या चरित्रग्रंथात येतो. अभंग या शब्दाला 'विशिष्ट काव्यप्रकार' असा अर्थ नामदेवांपासून रूढ झाला. 'ज्याला भंग नाही तो अभंग', हा अभंग या शब्दाचा अर्थ उत्तरकालीन आहे.

**अभंग : विकास आणि लोकप्रियता :-**

निवृत्तीनाथ, ज्ञानदेवांपासून अभंगरचनेला सुरूवात झाली. सुरूवातीचे अभंग तीन चरणी, त्यापेक्षाही मोठे, पंचवीस-तीस चरणांपर्यंतही आहेत. ज्ञानदेवांचे अभंग, ज्ञानदेव, निवृत्तीदास, बापरखुमादेवीवर इत्यादी नावांनी रचले आहेत. त्यांच्याकडून चार ते सहा चरणांचा एक लहान व एक मोठा या प्रकारांतून सर्व संतांनी अभंगरचना केली. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, चोखामेळा, सोयराबाई, एकनाथ, निळोबा इत्यादी सर्वांनी अभंगरचना केली. नामदेव-ज्ञानदेवांनी अभंगाला लोकप्रियता मिळवून दिली. हे अभंग मुसलमानी आक्रमणाखाली देश उद्ध्वस्त होत असतांनासुध्दा टिकून राहिले. ज्ञानदेवानंतर एकनाथांनी अभंगवाणी टिकवून ठेवली. तुकारामांनी ज्ञानदेवांनी रचलेल्या अभंगमंदिरावर कळस चढविला व या कळसावर ध्वजा होण्याचे कार्य संत बहिणाबाईंसारख्या संत कवियत्रीने केलेले आहेत.

समाजाला भक्तीच्या मार्गाला लावण्यासाठी संतांनी 'अभंग' हे साधन वापरले. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांचे अभंगच जास्त लोकप्रिय झाले. कारण अभंग आकाराने आटोपशीर असतो. थोडक्यात पुष्कळ आशय

अभंगातून सांगितला जातो. लहान व मोठा असे अभंगाचे प्रकार असून अभंग जितका लहान, तितका तो परिणामकारक ठरतो. अभंगाच्या लोकप्रियतेविषयी 'संतवाणीतील पंथराज' या ग्रंथात शं.गो.तुळपुळे म्हणतात, ''अभंग हा आटोपशीर व सुभाषितवजा असल्याकारणाने तो पाठांतरास सुलभ होऊन बसला. त्यामुळे तो कीर्तन - प्रवचनकारांच्या मुखी तर रूळलाच; पण त्याशिवाय सहद्‌गावधी लोकांच्या तोंडीही तो खेळू लागला, खऱ्या अर्थाने लोकप्रिय झाला.''[४] थोडक्यात, अल्पाक्षरत्व व पाठांतरसुलभता यांमुळे अभंग लोकप्रिय झाले. अभंगाच्या लोकप्रियतेचे दुसरे कारण सांगतांना शं.गो.तुळपुळे म्हणतात, ''अभंगाला लोकप्रियता लाभण्याचे आणखी एक कारण आहे ते म्हणजे अभंगाच्या ओळीओळीतूनच नव्हे, तर शब्दाशब्दातून दिसणारे त्या त्या संताचे असामान्य व्यक्तिमत्त्व. मराठी मनाला व्यक्तिपूजा मानवते किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर कसेही असो, ते मन संतांचे पूजक आहे, हे निश्चित. गेली काही शतके ते 'ग्यानबा-तुकाराम' या नावाचा गजर करीत आले आणि पुढेही करीत राहणार आहे. इतिहासातील काही नावे त्या त्या वेळेच्या राजकारणामुळे लोकप्रियतेच्या लाटेवर चढतात व ती लाट ओसरली म्हणजे पुन्हा खाली येतात. संतांच्या नावाचे असे नाही. ती मनाला सदाच भुरळ पाडतात. ज्ञानदेव, तुकाराम, रामदास या नावातच अशी काही मोहिनी आहे की त्यांना मरण नाही. ज्ञानदेवांच्याच शब्दात सांगावयाचे तर ती 'संजीवन नामे' आहेत. या नावाची मुद्रिका घेऊन अभंग अवतरला म्हणजे तो चित्ताची पकड घेतो. कारण एका अभंगात त्याच्या कर्त्याचे संबंध चरित्रचित्र उमटलेले असते, तो फार बोलका असतो.''[५] थोडक्यात, अभंगाचा उच्चार केल्याबरोबर अभंगरचना करणारी व्यक्ती आपल्यासमोर उभी राहते. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा, जनाबाई, मुक्ताबाई, सोयराबाई, बहिणाबाई इत्यादींनी अभंगाला लोकप्रियता मिळवून दिली. कीर्तनाच्या माध्यमातून अभंग लोकप्रिय झाला. या संदर्भात जनाबाईचा एक अभंग प्रसिध्द आहे. जनाबाई म्हणतात,

''एकच टाळी चद्रभागे वाळवंटी । माझा ज्ञानराज गोपाळांशी लाह्या वाटी ।।१।।

नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग । जनी म्हणे बोला ज्ञानदेव अभंग ।।धृ।।

अभंग बोलता रंग कीर्तनी भरला । प्रेमाचेनि छंदे विट्ठल नाचू लागला ।।३।।

...नामचाची जनी लोळे संतांच्या पायी । कीर्तन प्रेमरस अखंड दे गे विठाई ।।७।।''[६]

थोडक्यात, संतांची अभंगवाणी कीर्तनाच्या माध्यमातून लोकप्रिय झाली. संतांच्या अभंगवाणी माहात्म्य स्पष्ट करतांना 'संतवाणीतील पंथराज' या ग्रंथात शं.गो.तुळपुळे म्हणतात, ''संतांची अभंगवाणी हे महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचे परमभूषण आहे. तिचा उगम निवृत्तीनाथात आणि परिणती निळोबारायात झाली, हा ही एक योगायोग म्हटला पाहिजे. कारण निवृत्तीनाथ म्हणजे ज्यांनी भागवतमंदिराचा पाया रचिला त्या ज्ञानदेवांचे गुरू आणि निळोबा म्हणजे त्या मंदिरावर जे कळसरूप झाले त्या तुकोबांचे शिष्य. याप्रमाणे भागवत संप्रदायाला प्रेरणा देण्याचे प्रेरक आणि त्याला वैभवाचे शिखरप्राप्त करून देणाऱ्याचे वारस अशा दोन टोकांमध्ये या अभंगवाणीचा प्रसार झालेला आहे. त्यामधील अवकाशात अनेकांनी आपआपले सुर मिळवून व आपआपल्या प्रतिभेचे लेणे अर्पण करून तिला समृध्द केले आहे. त्यात ज्ञानदेव, तुकारामांसारखे चित्सूर्य आहेत, चोखामेळ्यासारखे पायिक आहेत. मुक्ताई-जनाईसारख्या साध्याभोळ्या स्त्रिया आहेत व शेख महंमदासारख्या अविंधही आहे. या अभंगवाणीला मधूनच काहीसा निराळा दिसणारा असा एखाद्या रामदासी खळाळही येऊन मिळालेला दिसतो. पण त्यामुळे तिचे मुळचे रूप पालटलेले नाही. उलट किंचित भिन्न वाटणाऱ्या या प्रवाहालाच तिने स्वरूपाकार करून घेतले आहे.''[७]

थोडक्यात, निवृत्ती-ज्ञानदेव, नामदेव-एकनाथ, दासोपंत-तुकाराम, रामदास इत्यादी रचनाकारांनी आपली रचना मराठीतून अभंगवाणीच्या माध्यमातून केली, हे ऐतिहासिक दृष्टीने मोलाचे ठरते. निवृत्ती-ज्ञानदेवांपासून तुकाराम-रामदासांपर्यंतच्या मराठी संतांनी या छंदातून रचना केली आहे. अभंग हा छंद मराठीच्या जन्मकाळाइतकाच प्राचीन आहे. अभंग ही संतांकडून महाराष्ट्राला मिळालेली देणगी आहे. अभंगाची संख्या मोठ्या प्रमाणात असून गुणांनीही अभंग श्रेष्ठ आहेत. निवृत्तीनाथांपासून निळोबापर्यंतच्या संतांनी अभंगवाणी लिहलेली दिसते.

अभंग तालगेय असतो. रागदारीत गाताना रचनेत अंगभूत असलेले तालाचे बंधन अभंगाच्या बाबतीत पाळावे लागते. मराठी वाङ्मयात गेली आठ शतके अभंग रूजलेला आहे. ग्रामीण व शहरी अशा दोन्ही वर्गांच्या तो परिचयाचा झाला आहे. अभंगाचा परिणाम सामान्य माणसावर, विशेषतः ग्रामीण भागातील जनतेवर झाला आहे. अभंग संतांच्या

सहजवाणीतून बाहेर पडतो. अभंगाची रचना लवचिक असल्याने धावत्या चालीवर तो गाता येतो. अभंग अंतर्गत वेदनेला वाट करून देतो. प्रसंगी तो कठोर होतो. अभंगाच्या माध्यमातून संतांनी देवाला जाब विचारला. दुःखाला वाचा फोडण्याचे काम अभंग वाङ्मयाने केले. अभंगाचे मानवी जीवनातील स्थान स्पष्ट करतांना 'ओवी ते लावणी' या ग्रंथात श्री.रं. कुलकर्णी म्हणतात, ''सामान्य जनजीवनास आपल्या 'जीवीचे गुज' अभंगात गवसते. आप्तासारख्या जवळचा आणि मित्राइतका निकटचा वाटावा एवढा जिव्हाळा अभंगाने जनमानसात निर्माण केला आहे. साहित्य, संस्कृती, सुधारणा एवढेच नव्हे, तर अक्षरओळख देखील ज्या थरात अद्याप पोचली नाही, त्या परिसरात मानवी मूल्यांची जाणीव व त्या मूल्यांचा बोध अभंग कित्येक शतके करीत आला आहे. खग, मृग, पशू यांना संगीताचा वेध लागावा तसा अभंगाचा लळा सामान्य समाजास लागलेला आहे. विश्वी विश्वंभर आणि जनी जनार्दन यावर प्रेम करण्याची दीक्षा अभंगानेच महाराष्ट्राला दिली. ''[८]

एकंदरित, मानवी जीवन विकसित करण्याचे सामर्थ्य अभंगात असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

अभंगामध्ये कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय सामावलेला असतो. अभंग हा लहान व मोठा या दोन प्रकारांत मोडला जातो. तेराव्या शतकापासून सुरू असलेली अभंगरचना आजही काही अधिक प्रमाणात होतांना दिसते. शब्दाला कविमनाची मुद्रिका देणे, विशिष्ट काव्यप्रकार, ज्याला भंग नाही तो अभंग असे अभंग या शब्दाचे विविध अर्थ स्पष्ट होतात.

अभंगकाव्याचा विकास व लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत गेली. वारकरी संप्रदायातील संतकवी व संत कवियत्रींची रचना अभंगकाव्यामधून झालेली दिसते. अभंगरचनेचा पाया ज्ञानदेवांनी घातला. तुकाराम त्यावरील कळस झाले.

अभंगकाव्याने मानवी जीवन सुसंस्कारीत करण्याची कामगिरी केली. मनोरंजनाबरोबर भक्तिभावाचा प्रसारही केला. समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथांवर अभंगाने प्रहार केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये अभंगाने शिकविली. मराठी भाषा व संस्कृती जोपासण्याचे कार्य अभंगकाव्य या वाङ्मयप्रकाराने केले, असे दिसून येते.

**संदर्भ सूची :-**

१. डॉ.कल्याण काळे(संपा), 'संतसाहित्य : अभ्यासाच्या काही दिशा', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्र.आ. नोव्हेंबर १९९२, पृ.२५
२. वि.का.राजवाडे, 'मराठी छंद समग्र साहित्य', खंड पहिला, इतिहासाचार्य वि.का.राजवाडे, संशोधन मंडळ, धुळे, प्र.आ.१९५५, पृ.२९२
३. रा.श्री.जोग, 'अभिनव काव्यप्रकाश', ऑगस्ट १९९१, पृ.२९२
४. शं.गो.तुळपुळे, 'संतवाणीतील पंथराज', पुणे, व्दितीयावृत्ती ऑक्टोंबर १९७०, पृ.३
५. तत्रैव, पृ.३,४
६. नामदेव आप्पा रामगावकर (संपा), ''वारकरी नित्यनेम भजनी मालिका', कराड, पृ.३१०
७. शं.गो.तुळपुळे, 'संतवाणीतील पंथराज', पुणे, व्दितीयावृत्ती ऑक्टोंबर १९७०, पृ.१
८. श्री.रं.कुलकर्णी, 'ओवी ते लावणी', पृ.८१

❑❑❑